नि.फौ.ख.क्र. २६५/२०२२
**निशाणी क्र. २०**

**<u>अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा उर्वरित सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत शपथेवर सुरू</u>**

६. सदर दिनांक १९/१०/२०२१ रोजीच्या एस. पी. ऑफिस पुणे येथे नोंदविलेल्या माझ्या लेखी तक्रार अर्जाची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर अर्जाची माझ्याकडे असलेली मुळ प्रत मी माझे वकील धनंजय दिक्षीत यांचेकडे दिली होती. आरोपींना मी ओळखतो. आरोपी क्र. २ आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींचे वकील श्री. एन. जी. शहा यांचे मार्फत सुरू.</u>**

७. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये पहिल्या पानावर सदर करारनामा कोणत्या तारखेला झाला ही तारीख नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये नमुद केलेली तारीख २०/१०/२०१६ यामध्ये खाडाखोड केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर तारखेमध्ये खाडाखोड केल्याबद्दल प्रतिस्वाक्षरी (Counter signature) नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये सदर करारनामा कोणत्या ठिकाणी झाला याबाबत नमुद केलेले नाही. निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये सदर करारनामा टंकलिखीत कोणी केला याबाबत नमुद केलेले नसुन टंकलिखीत करणाऱ्याची स्वाक्षरी देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्याचा मुद्रांक आरोपींनी घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये साक्षीदार क्र. ३ म्हणून रत्नाकर नागेंद्रआप्पा घुगरी यांचे नाव नमुद केले आहे परंतु सदर साक्षीदाराची स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वर मुद्रांक घेणार यांची सही धनाजी काशिनाथ कुंभार अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्याचा मुद्रांक इंदापूर तालुक्यामध्ये खरेदी केलेला नाही.

८. आता मला दिनांक ०१/०३/२०१६ रोजीचे पळसमंडळ विभाग क्र. ४ मधील जमिन गट क्र. ४८/१/अ च्या खरेदीपत्राची सही शिक्क्याची नक्कल दाखविण्यात आली. त्यास **निशाणी क्र. ४०** देण्यात येते. निशाणी क्र. ४० मध्ये कुठेही गहाणखत असे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वर ''खरेदीखत'' असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ४० मधील मजकूर लिहून घेणार व लिहून देणार यांचे सांगणेप्रमाणे नमुद केलेला आहे. माझे वडील हयात होते तोपर्यंत निशाणी क्र. ४० मधील मजकूर केवळ लिहून घेणार यांचे सांगणेप्रमाणे नमुद केला असलेबाबत त्यांनी कोठेही तक्रार केली नाही. प्रस्तुत फिर्याद दाखल करतेवेळी मौजे पळसमंडळ, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील गट क्र. ४८/१/अ चा ७/१२ उतारा पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर गट क्र. ४८/१/अ चा ७/१२ उताऱ्यावर आरोपी क्र. १ च्या नावाची नोंद दिनांक ०१/०३/२०१६ रोजीच्या खरेदीखतानुसार झालेली आहे. सदर आरोपी क्र. १ च्या नावाच्या झालेल्या नोंदीबाबत मी प्रांत कार्यालयामध्ये तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वरील खरेदीखत दुय्यम निबंधक कार्यालय, माळशिरस येथे नोंदणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विनोद विष्णू जाधव हे माझे भागीदार व मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वरील खरेदीपत्रावर विनोद जाधव यांनी ओळखदार म्हणून सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ४० वरील दस्त नोंद झालेनंतर साधारणपणे ८ वर्षांनी दिनांक २६/०१/२०२२ रोजी मी इंदापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये मी निशाणी क्र. ४० वरील दस्ताबाबत एस.पी.ऑफिस पुणे येथे तक्रार दिली होती. सदर तक्रारी अर्जाची चौकशी झालेनंतर दिनांक २६/०१/२०२२ रोजी एफ.आय. आर. दाखल झाली.

प्रश्नः निशाणी क्र. ४० वरील दस्त हा गहाणखताचा होता, लिहून घेणार यांनी फसवणूक करून सदर दस्त खरेदीखताचा दस्त म्हणून तयार

केला याबाबत दिनांक ०१/०३/२०१६ नंतर साधारणपणे साडेपाच वर्षानंतर म्हणजेच ऑक्टोबर २०२१ मध्ये पहिल्यांदा तक्रार दिली?

उत्तर: सन २०१८ मध्ये दिनांक ०१/०३/२०१६ रोजीचा व्यवहार संपुष्ठात आणणेसाठी जुन २०१८ मध्ये वालचंदनगर येथे माझ्या हिश्श्याचा फ्लॅट विनामोबदला साठेखत करून आरोपी क्र. १ च्या पत्नीच्या नावे करून दिले.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वरील दस्त हा खरेदीखताचा नसुन सदर व्यवहार व्याजभट्याचा होता व फसवणूक करून गहाणखत असताना देखील खरेदीखत म्हणून सदर दस्त लिहून घेणार यांनी तयार केला याबाबत सदर दस्त झालेनंतर साधारणपणे साडेपाच वर्षानंतर ज्यावेळी एस.पी.ऑफिस पुणे येथे मी तक्रारी अर्ज दिला त्यावेळेसच प्रथमत: केली. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ ते २०२१ या कालावधीत निशाणी क्र. ४० वरील दस्त हा तारण गहाणखताचा असल्यामुळे सदर दस्त उलटून मिळणेबाबत मी अथवा माझे वडीलांनी आरोपींना वकीलांमार्फत लेखी नोटीस पाठविली नाही. सन २०२१ मध्ये माझ्या वडीलांचे निधन झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये निशाणी क्र. ४० वरील दस्त हा गहाणखताचा होता व तो दस्त उलटून मिळावा याकरिता दिवाणी दावा दाखल केला नाही. साक्षीदार स्वत: सांगतो त्यावेळी माझे वडील आजारी होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे निधन झाले त्यावेळी मी सज्ञान होतो व माझा व्यवसाय देखील सुरू होता. माझे वडील आजारी होते त्यामुळे मी त्यांचेकडून मुखत्यापत्र घेउन निशाणी क्र. ४० बाबत दिवाणी दावा दाखल केला नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ च्या शेवटी व २०१७ च्या सुरूवातीच्या वेळेस नोटबंदी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादीमध्ये सन २०१५ साली नोटबंदी झाल्याचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत फिर्याद दाखल केली त्यावेळी मी बारामती येथे राहणेस

होतो. हे म्हणणे खरे आहे की, बारामती शहरामध्ये बारामती शहर व तालुका पोलीस ठाणे, डी.वाय.एस.पी. ऑफिस, अतिरिक्त एस.पी. ऑफिस इत्यादी पोलीस यंत्रना सन २०२१ पासून कार्यान्वित आहे. हे म्हणणे खरे आहे की, बारामती तालुक्यातील लोक सदन आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१५ मध्ये नोटबंदी झाली तसेच आमच्या तालुक्यामध्ये दुष्काळाचे सावट पडले असे नमुद केले आहे परंतु आमचा तालुका म्हणजे नक्की कोणता तालुका हे माझ्या फिर्यादीमध्ये नमुद नाही. माझे व्यवसायावर मंदीचे सावट आलेनंतर मी बॅंकाकडून आदीचे कर्ज असताना सुध्दा मिळेलतेवढे आणखी वाढीव कर्ज घेतले होते हे दाखविण्याकरिता पोलीसांकडे त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. सोमनाथ जयसिंह सपकळ यांचेकडून दिनांक ०१/०३/२०१६ रोजी रक्कम रूपये ४,५०,०००/— प्रतिमहिना ५ रूपये शेकडा व्याजदराने घेतले होते व त्यासाठी सेक्यूरिटी म्हणून माझ्या वडीलांचे नावावर असलेली पळसमंडळ, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील जमिन गट नं. ४८/१/अ मधील ३० गुंठे क्षेत्र त्यास खुशखरेदी करून दिले होते याबाबतचा वेगळा करारनामा दिनांक ०१/०३/२०१६ रोजी केलेला नाही. दिनांक ०१/०३/२०१६ रोजी कर्जाची रक्कम रूपये ४,५०,०००/— ठरलेल्या व्याजासह मी परत केलेनंतर सोमनाथ सपकळ यांनी सदर ३० गुंठे जमिन आम्हाला पुन्हा आमचे नावे करून दयायची याबाबत करारनामा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सिव्हील कॉन्ट्राक्टर असल्याने व्यवसायासाठी जमिन घेतली, त्याजमिनीवर बिल्डींग बांधली तर त्याबाबतचे खर्चाचे टिपण म्हणजेच नफा तसेच खर्च इत्यादीच्या नोंदीचे टिपण मी ठेवतो. बारामती येथे माझे व्यवसायाबाबतचे सन २०१९ पासून कार्यालय आहे. त्यापूर्वी माझे कार्यालय वालचंदनगर येथे होते. ठरले व्यवहारापोटी मी सन २०१६ ते २०१८ पर्यंत वेळोवेळी सोमनाथ सपकळ यांचा मेव्हुणा सोमनाथ उर्फ अंकुश नलवडे यांचेकडे ५,००,०००/— रूपये रोख रक्कम निव्वळ व्याजापोटी दिले होते याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही.

**नि.फौ.ख.क्र. २६५/२०२२**
**निशाणी क्र. २०**

साक्षीदार स्वत: सांगतो पोलीसांनी तो पुरावा मागितला नसल्यामुळे तो पुरावा मी दिलेला नाही. कथित व्याजाची रक्कम सोमनाथ नलवडे माझ्या ऑफिसमध्ये येउन घेउन जात असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. माझ्या फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे आरोपी क्र. १ यास त्याचेकडून घेतलेल्या ४,५०,०००/— रूपयांचे कर्जावर जुन २०१८ पर्यंत ५,००,०००/— व्याजापोटी देउनसुध्दा घेतलेल्या कर्जावर त्यांनी चक्रव्याज व्याजाने व्याज आकारून मुद्दल व व्याजासह माझेकडे आणखी १३,६५,०००/— रूपये इतकी बाकी असल्याचे सांगितले व सदर रक्कम लवकरात लवकर दया म्हणून माझेकडे तगादा लावल्याबाबत मी पोलीसांकडे अथवा सरकारी यंत्रणेकडे तक्रार केली नाही.

(आरोपींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करणेत येतो)

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक २०/१२/२०२५